# प्रकरण तिसरे

## "द.मा. मिरासदारांच्या कथेतील व्यक्तिरेखा"

# प्रकरण तिसरे

## "द.मा. मिरासदारांच्या कथेतील व्यक्तिरेखा"

### प्रास्ताविक :

मागील प्रकरणात आपण मिरासदारांच्या कथांचे आशय आणि त्यातील विनोदाचे स्वरूप याचा अभ्यास केलेला आहे. या प्रकरणात आपल्याला मिरासदारांच्या कथेतील व्यक्तिरेखांचा अभ्यास करावयाचा आहे.

मिरासदारांची कथा प्रसंगनिष्ठ असली तरी प्रसंग निर्माण होतात ते अखेर व्यक्तीमुळेच. मिरासदारांच्या कथातील प्रसंगनिर्मितीला या व्यक्ती, त्यांचे नमुनेदार, विक्षिप्त आणि त-हेवाईक असे स्वभावच कारणीभूत आहेत. या दोन्ही संग्रहातील बहुतांश कथा प्रत्यक्षातल्या माणसांच्या हकिगतीमधूनच निर्माण झालेल्या आहेत. म्हणजे यातील काही माणसे मिरासदारांनी पाहिलेली आहेत, काही ऐकलेली आहेत. याचे कारण असे की, त्यांना माणसाची ओढ आहे. माणसात त्यांना रस आहे. ते माणसामध्ये माणूस म्हणून रंगलेले आहेत. मिरासदारांचे हे वैशिष्टय स्पष्ट करताना प्रा. वा.ल. कुलकर्णी लिहितात – "त्यांना रस आहे तो माणसात. त्यांच्या विविध आचारविचारात आणि व्यवहारात. मग तो माणूस खेडयातील असो वा शहरातील असो. त्यांना माणसाच्या ठिकाणी आढळणा-या काही समान आचारविचारविषयक हास्यास्पद प्रवृत्तीमध्ये रस नाही असे नाही, कोणत्या लेखकाला व त्यातल्या त्यात विनोदी लेखकाला असा रस नसतो ? परंतु त्याहीपेक्षा अधिक रस त्यांना माणसामाणसामध्ये आढळणा-या वेगळेपणात आहे. हा माणसा-माणसामध्ये आढळणारा आगळेपणा, त-हेवाईकपणा, गावावेगळेपणा आणि त्यामुळे जीवन व्यवहाराला येत असलेली गमतीदार रंगत ह्यात त्यांना रस आहे." [१]

या संबधी स्वत: मिरासदार लिहितात, "खेडेगावची नमुनेदार माणसे

मला शोधावी लागली नाहीत. तीच मंडळी मला शोधत घरी आली. माझे वडील वकील आहेत. आमचे वास्तव्य जरी पंढरपूरला असले तरी त्यांचे सगळे पक्षकार खेडेगावचेच आहेत. या पक्षकारांची वर्दळ नेहमी घरी चालायची. .... खेडयातला इत्थंभूत वृत्तान्त मला घरातल्या घरात कळावा अशी ही सोय होती. त्यांचे बोलणे, चालणे, हावभाव यांचे अगदी जवळून निरीक्षण या काळात मी करीत होतो. हे सगळे नकळत होत होते. मला त्याची जाणीवही नव्हती." २

मिरासदारांच्या "माझ्या बापाची पेंड" आणि "गप्पागोष्टी" या दोन्ही कथासंग्रहातील कथातून ग्रामीण जीवनाच्या विविध थरातील आणि स्तरातील व्यक्ती आपणास भेटतात. त्यांच्या वृत्तीप्रवृत्तीसह ती आपल्यासमोर उभी राहतात. त्यांच्या जीवनक्रमात अनेकविध छटा दृग्गोच्चर होत होत असल्या तरी मिरासदारांनी त्या त्या व्यक्तिला एक विशिष्ट अशी, त्यांची खास अशी, जीला प्रधान म्हणता येईल अशी प्रवृत्ती बहाल केली आहे. त्यात अतिशयोक्ती आहे. विनोदी कथेसाठी त्याची आवश्यकताही असते. या कथासंग्रहातील व्यक्तिरेखांचा विचार करताना त्यांच्या प्रधान प्रवृत्तीनुसार व्यक्तिरेखांचे स्थूल वर्गीकरण करणे अभ्यासाच्या दृष्टीने सोयी-चे ठरते. हे वर्गीकरण पुढीलप्रमाणे मांडता येईल -

१) <u>इरसाल, धूर्त, बेरकी, बढाईखोर प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा</u> -

सोन्या बामण (सोन्या बामण), गणपत वाघमोडे (निकाल), तुका बनकर (कळस).

२) <u>उदार, मनमिळावू, समंजस प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा</u> -

गणपत पाटील (गणपत पाटील).

३) <u>भोळया-भाबडया प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा</u> -

प्रो.सदाशिवराव (एक सदाशिवराव आणि त्यांची बायको).

४) दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या व्यक्तिरेखा -

सोमशर्मा - (कोणे एके काळी), दत्तू चष्मेवाला (मुलें पळविण्याचा प्रकार), नाना थोडके (नव्याण्णवबादची एक सफर).

५) एखादी सवय अति स्वरूपाची असणारी व्यक्तिरेखा :

नागू गवळी (झोप).

६) मनामध्ये परंपरागत वैराचे पीळ जपणाऱ्या व्यक्तिरेखा -

अण्णा देशपांडे, रामू देशपांडे (भाऊकी)

७) इतर व्यक्तिरेखा -

कथेची गुंफण एखाद्या प्रमुख पात्राभोवती किंवा प्रसंगाभोवती गुंफलेली असली तरी कथेत इतर अनेक पात्रे असतात. ह्या पात्रांचे चित्रणही महत्त्वाचे असते. प्रमुख पात्राच्या किंवा घटनेच्या अवती-भोवती वावरणारी ही गौण पात्रे मिरासदारांनी परिणामकारकपणे चित्रित केलेली आहेत.

मिरासदारांच्या कथा लेखनातील व्यक्तिरेखांचे स्थूल वर्गीकरण वर केले आहे. त्यानुसार आपण त्यांच्या व्यक्तिरेखांच्या वैशिष्टयांचा अभ्यास करणार आहोत.

१) इरसाल, धूर्त, बेरकी, बढाईखोर प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा :

मिरासदारांच्या कथाविश्वातून डोळयापुढे येतात ते माणसांचे कितीतरी नमुने; त्यात खूप विविधता आहे. सोन्या बामणासारखा इरसाल व बढाईखोर (सोन्या बामण), गणपत वाघमोडे (निकाल), तुका बनकरासारख्या धूर्त व बेरकी (कळस) व्यक्तिरेखा त्यात आहेत. असल्या विविध प्रवृत्तींची माणसे त्यांच्या कथाविश्वात आहेत.

LIBRARY ... UNIV... ...SITY, KOLHAPUR

अ) सोन्या बामण -

केवळ ग्रामीण जीवनातच नव्हे, तर कुठेही शोधून सापडेल अशा या सोन्या बामणाचे व्यक्तिचित्र मिरासदारांनी आपल्या "सोन्या बामण" या कथेत चित्रित केले आहे. ब्राह्मण घराण्यात पण दारिद्र्यग्रस्त परिस्थितीत जन्माला आलेले हे पोरगे, धट्टीकट्टी प्रकृती आणि तितकेच धट्टेकट्टे मन यामुळे हसत, निर्लज्जपणे ते जगायला शिकते. "सरळ, लांबोडे नाक, उभट चेहरा, आणि शिसवीसारखा रंग. अंगावर कुणाचा तरी उतारा आणल्यासारखे कपडे. मराठी दुसरीच्या मानाने उंच. चांगलाच उंच आणि वयानेही जास्ती."[3] अशी त्याच्या बाह्य अंगाची ओळख लेखक करून देतो. हा बाप्या दुसरीच्या वर्गात होता आणि तो एकदा नापास होऊन सुध्दा नापास झाल्याचा त्याला विधिनिषेध नव्हता.

त्याचे नाव सोन्या देशपांडे. त्याचा बाप पटसर्पाने मेला होता. लहानपणापासून उघड्यावर पडलेले हे पोर वार लावून जेवते आणि जगते. इब्लिस असणाऱ्या या पोराच्या स्वभावात परिस्थितीने एक विचित्र असा निगरगट्टपणा आणला आहे. सोन्याला पुस्तकातले ज्ञान फारसे नसले तरी बाहेरच्या जगातले त्याचे ज्ञान भरपूर होते. एकेक गोष्ट तो चार-चार, पाच-पाच दिवस सांगत राही. तसा तो कल्पकही होता. हुशार माणसांना देखील न लागलेले शोध तो कधी कधी जाहीर करी. "असा एक शोध लागला आहे. आँ १ माणसाच्या पोटाला दार करायचं आणि आत पोटात एक पेटी ठेवायची!" असा एकदा तो लेखकाला म्हणाला, त्यामुळे लेखकाला लहानपणी सोन्या खूप मोठा असल्याचे वाटायचे.

सोन्याचा अभ्यासात आनंदच होता. तरीपण शाळेत येऊन तो खुशाल हुंदडे आणि शाळा आपल्या मालकीची अशा थाटात वागे. शाळेच्या भिंती-

वर तो चढायचा, पेन्सिलीने शाळेच्या भिंती चिताडायचा, आवारातली डाळिंबे साफ करायचा; कधी मुलांच्या टोप्या पळवून त्यांना रडवायचा; तर कधी मास्तरांची टिंगल करायचा, कुणी मास्तराकडे तक्रार केली तर "जाऊ द्या मास्तर, लेकराची जात आहे" असे स्वत:च म्हणायचा. एकदा मास्त-रांनी त्याला टोल द्यायला सांगितला तर पळ्ठयाने गजर देऊन शाळा सोडली. त्यासाठी हेडमास्तरांचा भरपूर मार त्याने खाल्ला. पण परिणाम नाही. असा विचित्र कोडगेपणा, हूडपणा सोन्याच्या ठिकाणी आला होता. भूगोलाच्या तासाला "बंगाली लोक मासे खातात. ब्राह्मणही खातात,मासे खाण्यास चांगले लागतात" असे वाक्य मास्तरांच्या तोंडून आल्यावर "मास्त-रांनी खाऊन बघितलेत वर कां!" असे म्हणून त्याने मरेस्तोवर मास्तरांचा मार खाल्ला होता. आणि वर "च्यायला, मास्तर अगदी लिंबाच्या पली-कडचा आहे" असे म्हणून पुन्हा खो खो हसण्याचीही त्याची तयारी असे.

प्रसंगी खोटेनाटे बोलून आपले काम उरकून घेण्याचे अनेक मार्ग तो शिकला. सोनाराच्या पोरान आपली माधुकरी विटाळली असे त्याच्या बापाला खोटेच सांगून त्याचे चिपटेभर तांदूळ उकळले होते. आणि त्याचा भात त्याने मरेस्तो-वर खाल्ला होता. "वेळेला केळ अन् वनवासाला सिताफळ" अशी त्याची वाट-चाल सुरु होती.

एकादशी-द्वादशीला चंद्रभागेच्या वाळवंटात वारकरी आंघोळ आटोपून आला की संध्येतली नावे ओठातल्या ओठात पुटपुटत सोन्या त्याला गोपीचंदनाचा नाम लावायचा आणि दक्षिणा उपटायचा. संस्कृतचा गंध नसलेला सोन्या संध्येतले एखाद दुसरे नाव मोठयाने पुटपुटायचा नंतर हळू शिव्या द्यायचा नंतर पुन्हा नामोच्चार करायचा असे करीत पैसे उपटायचा.

सोन्याच्या या उद्योगांनी त्याला उद्याच्या जाण्याचा मार्ग दाखविला.

सोन्या पुढे कूलकर्णी झाला. सातबाराचे उतारे देवून पैसे काढणे, उता-यावर खोटी नावे लावणे, लोकांना पैशासाठी नाडणे, वांदं झालेल्या माणसाला गोत्यात आणणे, तुरुंगात घालणे असल्या उद्योगात तो तरबेज झाला. एकदा तर ज्यानी खून केला त्यांचा तो खून सोन्याने पचवून दाखविला. एक विचित्र निर्घृणपणा आता सोन्याच्या ठिकाणी आला. लांड्यालबाडया, अफरातफर, हकालपट्टी आणि पुन्हा नवी नोकरी असा त्याचा आयुष्याचा आराखडा तयार झाला.

लेखक जो जो मोठा होत गेला तो तो त्याच्या आणि सोन्याच्या जीवनाचे धागे तूटत गेले. त्याचे अलिकडचे उद्योग पाहून लेखकाला वाईट वाटे. तो जसजसा बिघडत चालला तसतसा लेखक त्याच्यापासून सावध राहू लागला. तरीपण बालपणी जुळलेल्या मैत्रीचे धागे कायमचे अलग होत नसतात. सोन्या-बद्दल कुणी काही वेडेवाकडे बोलले तर लेखकाला वाईट वाटे. लोकांचे बोलणे खरे आहे हे पटूनही वाईट वाटे. पण सोन्या अगदीच काही वाईट नव्हता. हे लेखकाला येथे सांगायचे आहे. तो सामान्य होता, चारचौघात चालण्या-सारखा होता, तो वाईट आता झाला. पूर्वी नव्हता. त्याच्या या कोडगे-पणात, निर्लज्जपणात, गुन्हेगारी वृत्तीतही माणुसकीचा ओलावा कुठेतरी लेखकाला दिसला होता म्हणून त्याची बालपणाची आठवण लेखक सांगतो. एका गरीब पोराला कागदाच्या गोळ्यात वाळू भरून लेखक मारायला धावतो. तेव्हा सोन्या त्याला अडवतो आणि केविलवाणा चेहरा करून म्हणतो;- "नको रे, जाऊ दे त्याला. आईबाप नाहीत त्या पोराला. त्याला नको मारूस." बस्स ! सोन्या एवढेच म्हणाला आणि त्याच्या डोळ्याला पाणीच आले."

इरसाल सोन्याच्या निबर, निर्घृण, गुन्हेगारी व्यक्तिमत्वाच्या आत कुठेतरी माणूसकीचा झारा लहानपणी वाहत होता. त्याची आठवण लेखकाला

होते आणि आपल्या मनातली त्याची प्रतिमा आठवणीने लेखक उजळ करतो. वेळप्रसंगी "खोटे बोला पण रेटून बोला" ही प्रवृत्ती सोन्याबामणाच्या स्वभावात आहे. त्या स्वभावधर्मानुसारच तो जीवन जगतो आहे. पण लेखक म्हणतो की परिस्थितीतून तो असा घडत गेला, वाईट मार्गाला लागला आणि अशी समाजात कितीतरी माणसे घडत असतात त्याचा एक नमुना म्हणून सोन्या बामण चांगला लक्षात राहतो.

ब) गणपत वाघमोडे :

ग्रामीण भागात शेतीवाडीच्या, दत्तकप्रकरणाच्या वा अन्य कारणांवरून कोर्टकचे-या होतात त्यावेळी कोर्ट-कचेरीतील खाचा-खोचा माहित असणारी धूर्त, कावेबाज व्यक्ती या गोष्टीचा कसा फायदा घेतात हे "निकाल" कथेतील "गणपत वाघमोडे"च्या व्यक्तिचित्रणातून मिरासदारांनी मोठया मिस्कीलपणे दाखविले आहे. मिरासदारांचे शब्द ज्याप्रमाणे गावरान विनोद अचूक पकडू शकतात त्याप्रमाणे ग्रामजीवनातील व्यक्ती आणि वल्लीही नेमकेपणाने रेखाटू शकतात. गणपत वाघमोडे हे त्याचेच उदाहरण होय.

गणपत वाघमोडे वयाच्या तीस-पस्तीसाव्या वर्षी एका म्हातारीला दत्तक जातो. म्हातारी गचकल्यानंतर तिची सगळी इस्टेट गणपतला मिळाली होती. पण विरूद्ध बाजूच्या लोकांनी असा दावा केला की, दत्तकविधान मुळी झालेच नाही. गणपतने म्हातारी मेल्यावर मुड्याचा आंगठा घेऊन खोटीच कागदपत्रे रंगविली व इस्टेट बळकावली. तेव्हा गणपतचा खरा इस्टेटीवर हक्क नसून तो आमच्या अशीलाचा आहे, तोच म्हातारीचा जास्त जवळचा नातेवाईक आहे. प्रत्यक्ष नातूच आहे. तेव्हा त्याला सगळा जमीनजुमला मिळावा.

श्रीयुत उघडे या नामांकित वकिलाकडे गणपत वाघमोडे या दत्तक विधानची केस सोपवितो. गणपत वाघमोडे कडून जास्तीत जास्त पैसे उकळण्याच्या हेतूने उघडे वकील सुरूवातीस टाळाटाळ करतो, गणपतला दाद लागू

देत नाही. नवीन मुन्सफसाहेब पैसे खात नाही. तो कोणतीही लाच स्वीकारत नसून लाच देणाऱ्या माणसाविरूद्द निकाल देतो असेही वकील गणपत वाघमोडे-ना सांगतो. केसची सर्व कागदपत्रे उघडे वकील पाहतात. निकाल आपल्या बाजूने लागेल याची त्यांना खात्री वाटत नाही म्हणून केसची सर्व फी अगोदरच वाघ-मोडेच्याकडून वसूल करतो. गणपतही वकिलाच्या बोलण्यातले काहीच समजले नाही असा आव आणतो आणि केसच्या फीतले पन्नास रुपये देतो व बक्षिसी मागू नका असे सांगतो. वकिलही चटकन कबूल करतो.

उघडे वकिलांनी नवीन साहेबाच्याविषयी सांगितलेल्या माहितीचा फायदा गणपत वाघमोडे बरोबर उठवतो आणि केस आपल्या बाजूने करतो. केसचा निकाल पाहून उघडे वकिलही आश्चर्यचकीत होतात. पण तसे न भासवता आपण केलेल्या कामाचं सार्थक झाल म्हणून वाघमोडेंच्याकडे बक्षिसी मागतो. त्या-वेळी गणपत वाघमोडे आपली केस निकाल करण्याचा पायंट, आड्डी वकीलांना सांगतो,- "साहेब पैसे खात न्हायी म्हून तुमीच बोलला न्हवं ? ... कुनी पैसे धायला लागलं तर निकाल विरूद्द देतो त्यो. व्हय का न्हाई ? ... मग तीच आडो केली म्या.... मी दुसऱ्या माणसाबरोबर पैसे लावून दिलं त्येंच्याकडं. नांव मात्र सांगितले विरूद्द बाजूचं. मग जे साहेब भडकलाय म्हनतां ! अराररा ! काय इचारू नगा. न्हाई न्हाई त्ये बोलला त्या माणसाला. पुन्हां फळांची करंडी पाठवली. भाजी पाठविली. जास्तच भडकला गडी. मग काय ? निकाल आपल्यासारका !" ४

कोर्टकचेरीच्या कामात धूर्तपणा, कावेबाजपणा कसा असतो याचे चित्रण "निकाल" या कथेत गणपत वाघमोडे या व्यक्तिचित्रणातून मिरासदार विनोदी पध्दतीने करतात. वाघमोडे भोळा-भाबडा आव आणून मोठ्या धूर्तपणे आपल्या वकिलांकडून नवीन साहेबांचा अंदाज घेतो. व वकिलावर, साहेबावर आणि विरूद्द बाजूच्या लोकांवर बरोबर कुरघोडी करतो.

ग्रामीण भागात असणाऱ्या धूर्त व्यक्तींचा प्रतिनिधी म्हणूनच मिरासदारांनी वाघमोडे आपल्यासमोर साकार केला आहे.

क) तुका बनकर :

"कळस" ही कथा किस्सा स्वरूपाची आहे. गावातली सदा वाण्याची उठवळ स्त्री पळून जावी आणि त्याच गावातील तुका पैलवानाने तीला ठेवावी ही हकीगत. परंतु या कथेतून "तुका बनकर" याच्या बेरकी स्वभावामुळे तो चांगलाच लक्षात राहतो. वरून चारित्र्यवान दिसणारा तुका पैलवान कथेच्या शेवटी आपल्याला तो कोणत्या चालीचा आहे हे ओळखते आणि वाचकाच्या मनावर त्याच्या बेरकी स्वभावाचा चांगलाच प्रभाव पडतो.

गावालगतच्या महादेवाच्या देवळातील एका ओवरीत रात्रीच्या वेळी तुका बनकर अंगावर पांघरूण घेऊन निवांत पडला होता. यावेळी तुका पैलवानासोबत गप्पा मारायला रामा खरात, नामा चौगुले, गणपत वाघमोडे आणि सदा वाणी देवळात येतात. त्या चांडाळचौकडीत जगण्याच्या उठवळ बायकोची चर्चा सुरू होते. ते तुका पैलवानाला आवडत नाही. तो सांगतो,– "लेकानूं काय इचार ?– हे म्हादेवाचं देऊळ. आपन हितं काय बोलावं, काय बोलू ने, एवढंसुदिक कळू ने का ? देवाच्या पायापाशी ह्या फाजीलपणा करायचा म्हंजे काय म्हणावं तुमास्नी ?" गावच्या पैलवानाने असा दम दिल्यावर कुणाची मान वर करून बोलण्याची ताकद आहे ?

गप्पा सुरू झाल्यापासून तुका अस्वस्थ झाला होता, कुणाशी बोलत नव्हता. काही वेळाने तुका खालच्या आवाजात म्हणतो,–"आज ईस वर्स झाली. ह्ये म्हादेवाचं देऊळ हाये आसं हाये. आपल्याला आठवतंय तसं आसंच हाये. त्येचा कळस बांधायचं काम पडलं मागं त्ये पडलंच." आणि या तुका पैलवानाच्या "कळसा"ची युक्ती बरोबर लागू पडते आणि आलेली चांडाळ चौकडी कणीचे

नांव काढताच एक-एक करून परी निघून जाते. सगळे देवळातून निघून जाताच समोरच्या अंधारातून कुणीतरी व्यक्ती आलेली दिसली.

चेहरा दिसत नव्हता; पण तुकाने त्या अंधारातही ते माणूस बरोबर ओळखले. अंगाला आळोखेपिळोखे देऊन तो कंटाळलेल्या आवाजात म्हणाला, "कोन राधे, आलीस का तू ?.... त्ये वळखलं मी, तकडची पाकुळी उडाली तवाच... गेली. मला वाटलं, ह्तिंच झोपत्यात काय की ! मग काडलं काय तरी बोलन्यावरनं बोलनं. पैशे मागितले. मंग काय ? पळाले समदे !.. आता काय भ्या न्हाई;- ये वर !" [५]

अशा प्रकारे मिरासदारांच्या तुका पैलवानाने खरच "कळस" गाठला आहे. समाजात चारित्र्यवान आणि प्रतिष्ठित असल्याचा "आव" आणणारी माणस कशी कावेबाज असतात हे "तुका पैलवाना"च्या चित्रणातून मिरासदार दाखवितात. ग्रामीण भाषेतच बोलावयाचे तर "खाल मुंडी अन् पाताळ धुंडी" अशा माणसाचा हा नमुनाच आहे.

२) <u>उदार, मनमिळावू, समंजस प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा</u> :

ग्रामीण जीवनातल्या बेरकी, धूर्त, इरसाल व्यक्तिरेखा जेवढया तन्मयतेने मिरासदार रेखाटतात तेवढयाच तन्मयतेने मनानं दिलदार, मनमोकळया स्वभावाच्या, समजस प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा ते रेखाटतात. ग्रामीण जीवनातल्या विसंगती-बरोबरच तेथील मायाळू अंतरंगाचा वेध घेण्याचा प्रयत्न मिरासदार "गणपत पाटील" या कथेत करतात. गणपत पाटलांचा उदार, मनमोकळा स्वभावच त्यांचे व्यक्तिचित्र रेखाटायला प्रवृत्त करतो.

<u>"गणपत पाटील"</u>:

"गणपत पाटील" या कथेत "गणपत पाटलांची" ठळक व्यक्तिरेखा

UNIVERSITY ... HAPUR

मिरासदार रेखाटतात. गणपत पाटलांची ओळख करून देताना मिरासदार हुबेहुब व्यक्तिचित्र रेखाटतात. "गणपत पाटील मोठा बघण्यासारखा गडी होता. उंचीन बुटका, अंगानं जाड. पोट पुढं आलेलं. रंग हत्तीप्रमाणं काळाशुभ्र. चालायला लागला की, डुलायचा. पोटावरचं धोतर नेहमी खाली सरकत असायचं आणि गणपत ते सावरीत दोन्ही हातांनी पुन्हा कमेरेला लावीत असायचा. डोळे इतके बारीक की काही विचारू नका. जरा हसला की गालांत बुडायचे आणि पाटील नेहमी आपला हसत असायचा. त्यामुळं नव्या माणसाला बराच वेळ त्याचे डोळे दिसायचेच नाहीत. हा माणूस सारखा डोळे झाकूनचं, बगळ्याप्रमाणं बसलेला असतो की काय, अशी त्याला शंका यायची." ६

गणपत पाटील हा गावचा पाटील असल्यामुळे गावातील किरकोळ मारामाऱ्या, भांडणे, तक्रारी सोडविणे, तलाठयाकडून सरकारी कामकाज करवून घेणे, इतर वेळी मोकळ्या गप्पा हाणने एवढाच उद्योग होता. घरी ज्वारी, उसाचे पीक चांगले होते. म्हातारी आई घरचा कारभार बघत होती; तर तरणीताठी बायको, मुले, गुरेढोरे पाहत होती. त्यामुळे पाटलांना घरचा असा उद्योग नव्हता.

त्यात गणपत पाटलांचा स्वभाव मुळातच विनोदी होता. त्यामुळे अनेक गंमती-जमतीचे प्रकार घडवून सतत हसत राहणे. या प्रकारात त्याला मजा वाटायची असेच एकदा गावातल्या तुकारामाची गंमत करून त्याचे त्याच्या मुलग्याचे व बायकोचे भांडण लावून दिले आणि आपण हा मजेशीर प्रकार पाहत राहिला. पण पाटील कुत्सित स्वभावाचा नव्हता. तो दिलदार मनाचा होता. नवराबायकोच्या भांडणाची रूजवात घालून, दोघांची समजूत काढून घरी पाठवायचा आणि गड्यांना हुकूम करायचा.- "ए भडव्या, बगत काय हुभा -हायलास गाडवासारखा ? जा घरचं दोन ऊस काढून दे लेकराला खायला. आन् जनाबाईला पायलीभर ज्वारी घाल जा. पळ. तुकाराम, ये येडया, बस्. पानतंबाखू खा."

आणि खरोखरच पाटील हे बोलण्याप्रमाणे करायचा देखील. त्यामुळे थट्टा मस्करी होऊन देखील माणसं चिडत, रागावत नसत. घटकाभर मौजमजा करून माघेची पाखर घालणारा स्वभाव, यामुळे गणपत पाटलांवर लोकांचे फार प्रेम होते. त्यांच्याविषयी लोकांना आपुलकी वाटे. पाटलासाठी वाटेल ते करायला तयार होत.

गणपत पाटील मनान उदार, मोकळ्या स्वभावाचा असला तरी मोठा इरेसरीचा गडी होता. पाटलांच्या भावकीतल्या एका विधवा बाईन आपल्याला न विचारता माहेरच्या माणसाकरवी शेती करण्यास सुरवात केली. मग मात्र गणपत पाटील बिथरला. या बाईने आपली जमीन बळकावली म्हणून फिर्याद केली. पण केसचा निकाल सखुबाईच्या बाजूने लागला. यामुळे चिडून पाटलाने सखूबाईची रानातली खोप पेटविली. गडीमाणसांना मारहाण केली. निकाल आपल्या बाजूने लागला असताना देखील शेवटी सखूबाई हतबल होऊन पाटलांना शरण येते. मग मात्र पाटील म्हणतात,- "आगं, उगी गंमत केली म्या. मला काय कळत न्हाई व्हय?" आणि आपल्या नोकर माणसांकरवी तिची खोप बांधून व इतर नुकसान भरपाई दिली.

गणपत पाटील उदार, प्रेमळ आहेच पण अहंकार जोपासणारा आणि इरेसरीचा गडी आहे. गावातल्या प्रत्येक व्यक्तीने आपल्याला मान द्यावा, आपला विचार सल्ला घ्यावा, ही प्रवृत्ती. मनाविरूद्ध घडले तर गणपत पाटलासारखी व्यक्ती कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब करते आणि हतबल व्यक्ती शरण येताच परत तेवढयाच दिलदारपणे, मनमोकळेपणाने आणि स्व-खर्चाने नुकसान भरपाई देते. मिरासदार आपल्या खास ग्रामीण ढंगात "गणपत पाटील"हे व्यक्तिचित्र रेखाटतात.

३) <u>भोळ्या-भाबड्या प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा :</u>

एका भोळ्या-भाबडया, स्वप्नाळू, भित्र्या पण प्रामाणिक अशा

व्यक्तिचे व्यक्तिचित्र मिरासदार "एक सदाशिवराव आणि त्यांची बायको" या कथेत रेखाटतात. सदाशिवरावांच्या स्वभावावरच नेमके बोट ठेवून ही कथा पुढे सरकत राहते आणि मोठी रंजक बनते.

प्रो. सदाशिवराव :

प्रो. सदाशिवरावांचा परिचय करून देताना मिरासदार लिहितात - "प्रोफेसर सदाशिवराव हे आतां चाळिशीला आले होते. तसे त्यांचे सगळे उत्तम होते. नोकरी व्यवस्थित होती. पगार भरपूर होता. लग्न होऊन पंधरा वर्षे लोटली होती. पोटी पुत्रसंतान नव्हते आणि म्हणून ते दु:खी होते अशांतलाहि काही प्रकार नव्हता. ईश्वरी कृपेने ती संपत्ति घरांत भरपूर होती. निदान कमी तरी नव्हती. तरी पण प्रो. सदाशिवराव मनांतून थोडे दु:खी होते. या पंधरा वर्षात आपल्यावर फारच अन्याय झाले आहेत आणि आपण पददलित वर्गात जमा झालो आहोत असे त्यांना मनापासून वाटत होते. बायको घरांत आल्यापासून आपले स्वातंत्र्य खलास झाल्याची खरखर त्यांना फार वाटत होती. अरे, म्हणजे हें आहे काय ! घरात काडीची सत्ता नाही. जिथें तिथें हिचा तोरा." [७] या सगळ्या प्रकाराचा सदाशिवरावांना वैताग आला.

आपल्या या बायकोच्या त्रासामुळे तिला वठणीवर आणण्यासाठी प्रो. सदाशिवराव विचार करु लागले. अन् याचा परिणाम इतकाच झाला की त्यांना रोज रात्री बायकोला मारल्याची व ती दिनवाणीपणे क्षमायाचना करते आहे अशी स्वप्ने पडू लागली. तेव्हढेच सदाशिवरावांना मानसिक समाधान मिळूं लागले. मध्यंतरी एक भयंकर इंग्रजी चित्रपटही बायकोला दाखवला, वर्तमानपत्रातील नवरा-बायकोच्या भांडणाची व त्यामुळे झालेल्या खुनाची बातमीही वाचून दाखविली. पण त्याचा काडिमात्र

परिणाम त्यांच्याबायकोवर झाला नाही. एके रात्री सदाशिवरावांना एक भयंकर स्वप्न पडले व ते झोपेतच मोठ्याने किंचाळून जागे झाले. सदाशिवराव बायकोला स्वप्न सांगू लागलेत पण त्यांना मधेच अडवून ती म्हणते,- "स्वस्थ पडू या माणसाला. पुन्हा अशी स्वप्ने पडली तर बघा. खबरदार, सांगून ठेवते !" आणि त्यानंतर सदाशिवरावांना कधीच भयंकर स्वप्न पडले नाही.

चार-आठ दिवसानंतर चाळीतील मोलकरीण गंगीला तिचा नवरा बेदम मार देतो हे दृश्य सदाशिवराव व चाळीतील अनेक पुरुष पाहतात आणि त्यांना आनंद वाटतो. येथे नेमके पुरुषप्रधान संस्कृतीचे मनोज्ञ दर्शन मिरासदार रेखाटतात. आपल्या बायकोच्या वैतागाने काहीच करता येत नाही, हे सदाशिवरावांचे दु:ख, गंगू मोलकरणीला तिच्या नवऱ्याने मारणे या प्रसंगात भरुन निघते.

बायकोला वठणीवर आणण्याची प्रबळ इच्छा असणारा पण ती प्रत्यक्षात आणू न शकणारा सदाशिवराव स्वप्नातून आणि मोलकरणीला तिच्या नवऱ्याने मारणे या सारख्या प्रसंगातून आपल्या अतृप्त इच्छेची पूर्ती करुन घेतो. तेही समाधान त्याला मिळत नाही. कारण पत्नीच्या दरडावणीबरोबर ही सुखस्वप्नेही बंद होतात. प्रो. सदाशिवरावांचे व्यक्तिचित्र रेखाटताना मिरासदार सदाशिवरावांच्या भोळया भाबडया स्वभावावरच नेमके बोट ठेवतात आणि थोड्याफार अतिशयोक्तीचा आधार घेतात. त्यामुळेच हे व्यक्तिचित्र उठावदार बनते.

४) <u>दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या व्यक्तिरेखा :</u>

"कोणे एके काळी" मधील सोमशर्मा, "नव्याण्णवबादची एक सफर" मधील नाना घोडके आणि"मुले पळविण्याचा प्रकार" या कथेतील दत्तू चष्मेवाला या व्यक्तिरेखा अभ्यासत असताना डोळयात आसू केव्हा उभे राहतात ते आपणास कळत नाही. वरील व्यक्तिचित्रणांतून आपणास जाण-

करणारे कारुण्य हास्याच्या गलबल्यातही दु:खाची नेमकी चाहूल जाणवून देते. मृत्यू, दारिद्र्य, भूक इत्यादीशी संबंधित असणाऱ्या भावानुभवाचे करुण नाटय लक्षात घेण्याची आणि अत्यंत नाजूक हातांनी शब्दबध्द करण्याची शक्ती मिरासदारांच्या लेखणीत निश्चित आहे. वर उल्लेखिलेल्या व्यक्ति-चित्रणांतून आणि कथांतून ह्याचा प्रत्यय येतो.

अ) सोमशर्मा :

केवळ ज्याच्यामुळेच मोहिनीने प्रसन्न व्हावे असे बुध्दिचातुर्य पोटासाठी विकावे लागणाऱ्या चतूर पुरुषाचे दु:ख मिरासदारांनी "कोणे एके काळी" या कथेत चित्रित केले आहे. सोमशर्माचे हे दु:ख अबोल आहे. ते रसिकांच्या मनाला चटका लावून जाते.

सोमशर्मा आपले मनोगत व्यक्त करताना म्हणतो;- "या टीचभर खळगीच्या निमित्ताने जेंव्हा मी दाही दिशा हिंडत होतो तेंव्हा त्यांनीच मला आश्रय दिला होता. महाराजांच्या कृपेनेच हे स्थान प्राप्त झाले होते. इतक्या तरुणपणीच माझे भाग्य उदयाला आले याचे सगळ्यांना कौतुक वाटत होते. होय, त्यांच्या कृपेवर मी जगत होतो. त्यांच्या इच्छेनुसार हसत होतो आणि हसवीत होतो. आता त्यांच्या कृपेची पूर्ती करण्याचा हा समय होता. त्यांनी एक इच्छा व्यक्त केली होती आणि ती मला पूर्ण करणे भाग होते. मी केवळ त्यांच्या दृष्टीचा दास होतो. हातांच्या संकेतांचा सेवक होतो. धनी जे बोलेल ते ते वरच्यावर झेलण्यात भूषण मानणारा एक य:कश्चित चाकर होतो. मला ते करणे भागच होते." [८]

सोमशर्माच्या या आत्मनिवेदनातून त्याच्या महाराजांच्यावरच्या निष्ठेची, अन्नाला जागरूक असणाऱ्या, परिस्थितीची जाणीव असणाऱ्या, वास्तवाचे भान ठेवणाऱ्या प्रवृत्तीची ओळख पटते. कथेच्या शेवटी मोहिनीच्या बोलण्याने आणि स्माने वक्रतुंडाचा किंचितसा तोल सुटतो. पण परत तो आपले

दु:ख लपवितो व सगळ्यांना हसवता हसवता आपल्या डोळयांच्या ओलसर कडा पुसून टाकतो.

"सोमशर्मा" हा विदूषक आहे. त्या कामासाठीच राजाच्या पदरी त्याची नेमणूक होते, आणि मग चतुर, हजरजबाबी, विद्वान असा विदूषक नियतीने आपल्या वाटेला आलेले दु:ख केवळ विनोदाच्या सहाय्यानेच झाकून टाकतो. त्याचे हे अबोल दु:ख कथेच्या शेवटी वाचकाच्या लक्षात येते आणि त्या दु:खा-मुळेच सोमशर्मा उर्फ विदूषक वाचकांची सहानुभूती मिळवितो. मानवी जगतामध्ये सोमशर्मासारखे कित्येक लोक आपले स्वत:चे दु:ख पचवून दुस-यांना हसवत असतात. हास्याच्या आवरणाखाली लपवलेले दु:ख अधिकच कारुण्यपूर्ण बनते.

सोमशर्माच्या या व्यक्तिचित्रणातून मिरासदार मानवी मनाच्या गहिरे-पणाचा शोध घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. सोमशर्मा सारखे अबोल दु:खाचे व्यक्तिचित्र मिरासदार क्वचितच रेखाटतात.

ब) <u>दत्तू चष्मेवाला</u> :

"मुले पळविण्याचा प्रकार" ही कथा घटना, प्रसंगप्रधान आहे. या कथे तून दत्तू चष्मेवाला या व्यक्तिचे चित्रण ठळकपणे नजरेस येते. दत्तू चष्मेवाला आणि त्याच्या दरिद्री कुटुंबाचे चित्रणही या कथेत वास्तवपूर्ण येते.

दत्तू चष्मेवाला हा आपल्या दारिद्र्यग्रस्त कौटुंबिक परिस्थितीमुळे दैनं-दिन जीवनाला सामोरे जाताना भुरटया चो-या करतो. त्याच्या या व्यवसायाची ओळख करून देताना लेखक म्हणतो,—"दत्तू चष्मेवाला हा एक भुरटा चोर होता. लहान-सहान चो-या करता करतां तो आतां चांगला पोक्त माणूस झाला होता. तरीपण त्याचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. कोठे वाळत घातलेले कपडे पळव, कोठें बाहेर ठेवलेली खरकटी भांडीच चोरून ने, एखाद्या दुकानात बाहेर ठेवलेला माल गुपचूप खिशांत टाक, असले उद्योग त्याने आतापर्यंत केले होते.... पण त्यात

धोका तितकाच आणि प्राप्ति मात्र कमी. त्यामुळे दत्तू अलिकडे या उद्योगाला कंटाळला होता. वयोमानानुसार त्याचा प्रपंच बराच वाढला होता.... त्यामुळे दिवसानुदिवस दत्तुची परिस्थिती बिकट होत होती. ...दत्तूची बायको गंगी ही हि आपल्या परीने संसाराला हातभार लावीत होती."[१]

भूरटयाचो-या करण्यात धोका जास्त म्हणून दत्तू चष्मेवाला कुणातरी चांगल्या धनिकाचे मूल पळविण्याचे ठरवितो. हल्ली मुले पळविणा-या टोळ्या बरेच पैसे कमवतात. आणि मारवाडयाजवळ भरपूर पैसा असतो. एवढे त्याचे या उद्योगातले ज्ञान. या विचारानुसार गावातल्याच एका आडगल्लीत राहणा-या धनीचंद मारवाडयाच्या दहा-बारा मुलांपैकी एक पांच-सात वर्षाचा मुलगा पळवून आणतो. मूल पळवून आणल्यानंतर बायकोला व त्याला त्याला खूप आनंद होतो. आपण आता कुटूंबाचे दारिद्रय नष्ट करून मजेत दिवस घालवायचे असे ठरवतात. आलेल्या पैशाची कशी विल्हेवाट लावायची याचे गणित नवरा-बायको मनापासून करतात. पैसे मिळण्यासाठी दत्तु चष्मेवाला धनीचंद मारवाड्यास धमकीवजा पत्रे लिहितो. पण धनीचंद मारवाडी उलट टपाली कळवितो की, "मुलाची सर्व व्यवस्था करावी, आम्ही इकडे सुखरूप आहोत, आणखीन एखादा मुलगा हवा असल्यास घेऊन जावे." आपण केलेली योजना तर तडीस जातच नाही उलट आपल्या अंगलट येते आणि नको ती कटकट पाठीमागे लागते. या भानगडीतून पून्हा घोटाळा होऊ नये म्हणून मारवाडयाच्या मुलास घरपोच करतो व स्वखर्चाने वकिलामार्फत नोटीस काढतो.

मिरासदारांनी या कथेतून ग्रामीणतेबरोबर कुठेही शोधून सापडेल अशा व्यक्तिचे चित्रण केले आहे. तसेच धनीचंद मारवाडी आपल्या व्यापारी वृत्तीनेच स्वत:च्या मुलाकडे कसे पाहतो आणि व्यावहारिक दृष्टिकोण कसा स्वीकारतो याचे दर्शन घडून येते. मारवाडी लोकांच्या स्वभावावरही नेमके बोट ठेवले आहे.

पैसे मिळविण्याच्या आशेने मारवाड्याचे मूल पळविण्याचा उद्योग अंगलट आलेला दत्तू चष्मेवाला आणि मूल पळविल्याचे दु:ख न वाटता उलट खाणारे एक तोंड कमी झाले या आनंदात असणारा "श्रीमंत" मारवाडी यांच्या व्यक्तिमत्वातील परस्पर विरोधी मनोवृत्तीच्या दर्शनातून या कथेतील विनोद प्रवाही राहिला आहे.

क) नाना चोंडके :

"नव्याणणवबादची एक सफर" या कथेतील "नाना चोंडके" हा एक कल्पक थापाड्या, बढाईखोर आहे. प्रत्यक्षात मिरासदारांना असा नाना भेटला आहे. आपल्या प्रतिभेच्या डोहात बुडवून त्यांनी कथेतला नाना निर्माण केला सा-या गावची करमणूक करणारा नाना आत व्यथित आहे. जीवनातल्या या अपूर्णतेचे दु:ख तो काल्पनिक गोष्टींनी आणि बढाईखोर थापांनी भरून काढतो. लेखकाला त्याच्याबद्दल वाटणा-या सहानुभूतीमधूनच अशी व्यक्तिचित्रे निर्माण होतात. नानाच्या थापांचे मानसशास्त्र बरोबर हेरून मिरासदारांनी ते तितक्याच रंजकपणे निवेदन केले आहे. विनोदाच्या शस्त्राने मिरासदारांनी नाना चोंडकेच्याच नव्हे तर मानवी दु:खाचा वेध परिणामकारकपणे घेतलेला आहे.

लेखक नाना चोंडकेचा परिचय करून देत असताना म्हणतो,—"पूर्वी माण नामे देशात एक खेडेगाव होते. तेथे नाना चोंडके नावाचा एक अप्रतिम इसम राहात असे. हा इसम अगदीच बोंबलभिक्या असून दिसावयासही बेंगरूळ असे. वाळलेल्या चिपाडाच्या अंगात सदरा घातला, धोतर अडकवले, आणि वर एक चारपाच कोन असलेली मळकी पांढरी टोपी अडकवली, तर ते जसे सुरेख दिसेल, तसा हा माणूस दिसत असे. त्याचे डोके लहानसे होते. नाक प्रथम नम्रतने खाली वाकून नंतर पुढे टोकाला फुग्यासारखे फुगलेले होते. नानाची कातडी इतक्या तरूणपणीच चुरगळलेली असून तिचा रंग पिवळसर तांबडा किंवा तांबड-

सर पिवळा असा काहीसा होता. त्याची दोन्ही गालफडे एकमेकाला भेट-ण्यासाठी आत गेलेली होती. आणि त्यामुळे गालाची हाडे धीटपणाने वर आली होती. ती इतकी ठसठशीत दिसत होती की, त्याच्या तोंडा-मध्ये या गालापासून त्या गालापर्यंत एक लहानशी काठी आडवी करून घात-लेली आहे असे वाटावे. असा हा उंचीने कुळंगी जातीचा, निस्तेज चेहऱ्याचा माणूस तोंड उघडे ठेवून झोपला, म्हणजे बघणाऱ्याला तो मेला आहे असे वाटत असे." [१०]

असा हा वर्णन केलेला इसम गावात राहून अनेक प्रकारचे उद्योग करीत असे. शिलाई काम, तंबाखू विकणे असले किरकोळ उद्योग करणाऱ्या नाना-ला ना घर ना दार. धंद्याचे कसबही त्याच्याकडे नव्हते. विलक्षण कल्पना-शक्ती आणि तिच्या प्रकटीकरणास सहस्त्र हत्तींचे बळ असलेली जीभ ही नानाला मिळालेली देवाची मोठी देणगी. या दोन गोष्टींच्या जोरावर नाना गावाला एकाहून एक सरस थापा मारीत होता. घरोघर हिंडून गप्पा मारत राहणारा नाना ही गावची करमणूक होती. त्याच्या गोष्टी म्ह-णजे थापा आहेत हे माहित असूनही गाव त्या भान विसरून ऐकत होता. "नाना नव्याण्णवबाद" असे गावाने त्याचे ठेवलेले नावही यथार्थ आणि एकूण गावच्या वातावरणात शोभण्यासारखे होते. अशा या नाना घोडकेचे लग्न झालेले नाही; आणि होण्यासारखेही नाही. नानाच्या या मूक दुःखाला त्याच्या वारेमाप थापांतून वाचा फूटते. आपण मोठे कसे आहोत; आणि बायकांबरोबर आपण कसकशा भानगडी केल्या आहेत. याच्या वाटेल त्या हकीगती तो सांगत राहतो. आत्महत्या करता करता वाचलेला नाना शुध्दी-वर येताच पुन्हा थापा मारायला सुरवात करतो आणि गावच्या गप्पांना चैतन्य येते. नानाच्या जीवनातले कारुण्य विनोदाच्या आधारे प्रकट करण्याचा प्रयत्न मिरासदारांनी या व्यक्ति चित्रणात केला आहे.

थापाड्यांचा प्रातिनिधीक नमुना म्हणून "नाना घोडके" या व्यक्तिचे

चित्रण मिरासदार करतात. तो खूप बडबडया आणि कल्पक थापाडया आहे. लग्न न होण्याचे अपार दुःख तो आपल्या काल्पनिक थापांनी भरून काढतो व दुस-यांना हसवता हसवता स्वतःच्याही दुःखावर पांघरून घालतो. त्याच्या या थापेबाजी मागे, स्वतःचे दुःख विसरण्याचा प्रयत्न आहे. त्याच्या मनातील हा सल सतत सलत राहतो आणि शेवटी तो वाचकालाही जाणवतो.

५) <u>एखादी सवय अति-स्वरूपाची असणारी व्यक्तिरेखा – नागू गवळी :</u>

नागू गवळयाच्या झोपेची आणि त्याच्या झोपेने केलेल्या चोराच्या हालाची हकिगत अतिशय विनोदपूर्णतेने मिरासदारांनी "झोप" या कथेत वर्णन केली आहे. नागू गवळयाची झोपेची सवयच मिरासदारांना लेखनाला प्रवृत्त करते.

सपाटून झोप हे नागूचे वैशिष्टं विशद करताना मिरासदार म्हणतात,—"झोप हा नागू गवळ्याचा हातखंडा विषय होता. तो विद्वान असता तर या विषयावर तासन्तास बोलू शकला असता,—म्हणजे तितका वेळ तो जागा असता तर—इतका त्याचा या विषयातला अधिकार दांडगा होता. लग्नापूर्वी झोपेशिवाय कोणत्याही दुस-या अवस्थेत तो इतरांना आढळला नव्हता. पण त्यावेळची गोष्ट निराळी. इतर सगळ्याच पुरुषांप्रमाणे त्या वेळी तो राजा माणूस होता. पहाटे उठून मेहनत करावी, दूध पिऊन जे झोपावे ते दुपारी जेवायच्याच वेळेला जागे व्हावे, जेवल्यावर पुन्हा जे पडावे ते संध्याकाळी मेहनत करायलाच उठावे, आणि नंतर रात्री पुन्हा ताणून द्यावी,—असा त्याचा त्यावेळेचा सुरेख कार्यक्रम असे. पण आता तसे शक्य नव्हते. गेली दहा वर्षे त्याच्या पाठीमागे प्रपंच लागलेला होता. या दहा वर्षांत त्याला एकुण सात मुले झाली होती. सहासात म्हशी, तितकीच लेकरे आणि अवाढव्य अंगाची एक बायको इतक्या सगळ्यांची उस्तवार

करायची म्हटल्यावर त्याला झोपेला वेळ कुठून मिळणार ? ..... रात्री पेंगतच तो भाकरतुकडा खाई, हात धुऊन पानतंबाखूही झोपेतच खाई आणि झोपेतच बायकोला शिव्या घालीत झोपेतच झोपी जाई." ११

नागुचे मित्र कुणी पोलीस खात्यात शिरले; कुणी मोठया धाडसाची कामे करीत होती. आपणाही अशी काही धाडसाची कामे करून दाखवावी, असे त्याला सारखे वाटे. काही तरी अजब करून दाखविण्याचे मनोगत तो बायकोला सांगे. पण या झोपेनं नागूचा घात केला होता.

एके रात्री नागू गवळयाच्या घरात चोर शिरतो. आणि ट्रंकेच्या किल्लीसाठी चोर नागूला उठवण्याचा प्रयत्न करतो, मारहाण करतो पण नागूच्या झोपेत कसलाच फरक पडत नाही. नागूला मारमारून थकल्यामुळे आणि पहाट होत आल्यामुळे चोर चोरी न करताच घरातून बाहेर पडतो.

सकाळी उजाडल्यावर कपाळावरच्या जखमेत हळदचुना भरताना नागू बायकोला म्हणतो,—"अगं, एवढा मोठा चोर येऊन गेला घरात. मला उठवायचं न्हायीस ? ....चांगलं भुस्कट पाडलं आसतं की त्येचं मी. हयँ:। ..दाब चान्स आला हुता, पर घालवलास तू..." हे बोलता बोलता नागूला एकदम झोपच आली.

नागू गवळयाच्या या राक्षसी झोपेमुळेच त्याचे व्यक्तिमत्व गडद होत जाते. मिरासदारांनी आपल्या ढंगदार शैलीत, निवेदनात झोपेसारखी सवय असणाऱ्या नागू गवळयाचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे.

६) मनामध्ये परंपरागत वैराचे पीळ जपणाऱ्या व्यक्तिरेखा :

"भावकी" ही कथा परंपरागत वैराचे पीळ जपणाऱ्या आणि ते पीळ पिढयानपिढया चालविणाऱ्या कुटुंबाची हकिगत आहे. परंतु या कथेतील

अण्णा देशपांडे आणि राघू देशपांडे ही व्यक्तिचित्रे चांगलीच लक्षात राहतात.

अण्णा देशपांडेचे व्यक्तिचित्र त्याच्या स्वभाववैशिष्ट्यासह, लकबी सह मिरासदार उभे करतात - "अण्णा बोलायला मोठा चवळ होता. त्याचा चेहरा निबर दाखवीत होता. अंगानं भोद. चिरमु-याच्या पोत्यासारखा. अंगाच्या मानाने डोके बारीक. पाण्यावर आलेल्या बुडबुड्यासारखे ते दिसे. वर्ण ओम्मेशासारखा. डोळे बारीक आणि तांबडे. अंगाखांद्यावर सगळीकडे केसच केस. कानांत आणि नाकांत सुध्दा. त्याला नुसते पाहिल्यावर, याने आपल्या तरूणपणात खच्चून मेहनत केली असली पाहिजे, कित्येक बाया रंगवल्या असल्या पाहिजेत, आणि नाना पालथे धंदे केले असले पाहिजेत, असे सहज वाटे. अण्णा कुठेही आणि कसाही बसला तरी एका बाजूचे धोतर नेहमी वर घेतलेले असायचे. कमरेपर्यंतची मांडी दिसावी इतके. बोलणे अचकट. उपमा सगळ्या कमरेखालच्या यायच्या. हातवारे करून साध्या बोलण्यालाही पाचकळ अर्थ आणायचे कसब त्याच्या जवळ होते. संतापला म्हणजे तो दुस-ऱ्याला लाख शिवी मोजी. आणि दिलेली एक शिवी काही पुन्हा तोंडात येत नसे. भांडण तर त्याच्या पाचवीलाच काय, पण संबंध आयुष्याला पुजले होते. तोच त्याचा छंद होता. भावकीत भांडण काढण्यासाठी तो टपलेला असे." [१२]

तर राघू देशपांडे या व्यक्तिचित्राची उभारणी करताना "राघू देशपांडे दिसायला उगीच मुडदा होता. पण बारा टिकल्यांचा होता. गावातले सगळे लोक त्याला "एक्का" म्हणात. घुम्या येड्यासारखा तो फारसा बोलत नसे. पण बोलला म्हणजे असे बोलू लागे की, मिरच्यांचा खाट नाकात गेल्याप्रमाणे माणूस ठसके. पुन्हा त्याच्या तोंडाला तोंड कुणी देत नसे. एखादा आपल्या अंगाबाहेर आहे असे पाहिले की तेवढ्यापूरता तो गप्प बसे.

पण मागाहून सूडक-यासारखा त्याचा काटा काढी. भावकीतले कित्येकजण त्याने सपाट केले होते. अजून बधला नव्हता तो फक्त अण्णा.'[१३]

बामण आळीतल्या एका टोकाला असणा-या बल्लाळांच्या वाड्यात देशपांडे घराण्यातली सर्व कुटूंबे राहात होती. भावकीच्या निमित्ताने पिढीजात वैरभाव मनांत बाळगून त्यात सातत्य राखण्याचे कार्य देशपांडे घराण्यातली प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करते. भांडणासाठी कोणतेही निमित्त पूरे असे. आणि या वेळी तर प्रत्यक्ष आपल्या वै-याच्या मुलांबरोबर केशवला पाहताच अण्णा व राघू देशपांडे भांडणाला सुरवात करतात. लहान मुलांच्या निरागस, भाबड्या, भावूक जीवनात या भांडणाचे बीज उतरते आणि मनातल्या वैराचे हे पिढीजात पीळ आपोआपच तयार होतात. म्हणूनच चिंचबनात नेऊन केशवला झाडाला टांगून अनंता त्याला बेदम चोपतो.कारण नसतानाही हे वडिलधा-यांचे भांडण लहानापर्यंत पोचते. वैराचे सातत्य राखण्याची विचित्र अशी प्रवृत्ती या दोन व्यक्तिचित्रणातून दिसून येते. हीच प्रवृत्ती खेड्यावच्या प्रत्येक भावकीत दिसून येते.

अण्णा देशपांडे हा बोलून घाण करणारा आहे तर राघू देशपांडे न बोलून शहाणा, म्हणजेच "खाल मान्या अन् गाव तान्या" अशा स्वभावाचा नमुना आहे. समसमा स्वभावाचे नमुने सादर करून मिरासदार भावकीचे भांडण रंगतदार बनवितात.

<u>इतर व्यक्तिरेखा :</u>

मिरासदारांच्या कथातील ठळक व्यक्तिरेखा तर त्यांच्या-त्यांच्या स्वभावाने सदैव वाचकांच्या स्मरणात राहतातच. शिवाय त्यांच्या प्रसंगनिष्ठ अशा इतर कथांमधीलही व्यक्तिरेखा वाचकांच्या मनाची पकड घेतात. घटना, प्रसंगाच्या अनुषंगाने ती ती व्यक्तिरेखा ठळक नजरेत भरते.

अ) धायगुडे :

मिरासदारांची "माझ्या बापाची पेंड" ही कथा प्रसंगनिष्ठ असली तरी धायगुडे नामक इरसाल मुलाचे ठळक व्यक्तिचित्र नजरेसमोर येते. धायगुडे या विद्यार्थ्याने चोरुन खाल्लेल्या बापाच्या पेंडीने (म्हणजे गांजाने) जो चमत्कार दाखविला त्याचे चित्रण मिरासदार विनोदी घटना प्रसंगाने करतात.

धायगुडे नामक एक खेड्यातल पोरगं सकाळी शाळेला जायच्या वेळी घरी काही खायला मिळत नाही म्हणून गायीच्या गोठ्यातील पेंड खायला घेते. आणि पेंड खात-खातच शाळेला जायला निघते. हे पोरगे तसे इरसाल आहे. कारण आई खायला देत न्हायी म्हणून तिचा चुलीजवळचा इस्तू विझवू पाहते. पण बापाच्या माराच्या धाकाने घराबाहेर पडते. चोरुन पेंड घेते व गुमान शाळेला जाते. या लहान मुलाला प्रश्न पडतो की माझ्या बाला घरी बसून बक्कळ पैसे कसे काय मिळतात ?

शाळेत जाण्यास उशीर होईल म्हणून धायगुडे चड्डीच्या खिशात पेंडीचे लहान लहान तुकडे कोंबून चुरा तोंडात टाकतो. जाता जाता शेकोटी शेकणारे धायगुड्याला हटकतात पण तो मास्तरच्या भितीने शाळेकडे निघतो. जाताना मात्र त्याचे डोके गरगरायला लागते. त्याला वाटते की रात्री न जेवल्यामुळे असे होत असेल.

चोरुन खाल्लेल्या पेंडीने मात्र चमत्कार दाखविण्यास सुरवात करताच धायगुड्याला सुलटी माणसे उलटी दिसू लागली. शाळेतही सर्व विद्यार्थी उलटे-सुलटे तर होतेच शिवाय मास्तरही आज नेहमीप्रमाणे सरळ उभे नव्हते. खाली डोके आणि वर तंगड्या, हे दृश्य पाह्ताच धायगुडे फी-फी करुन असायला लागतो. मास्तर चिडतात व त्याला मार देतात. शेवटी धायगुडे मास्तरांना प्रश्न विचारतोच - "पण मास्तर-आज तुम्ही उलट्या तंगड्या

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

करून उभे कसे राहिला ? मग मात्र मास्तरांनी धायगुड्याला भयंकर चोप दिला आणि खिशातील सर्व माल जप्त करून टेबलवर ठेवला आणि स्वत: खावू लागले.

मास्तरांच्यावरही या पेंडीने परिणाम केला आणि मुलांना गणित सांगितले असताना झाला कारे इतिहास लिहून ? असे विचारतात आणि इतिहासातील अनेक चुकीचे संदर्भ देतात. इतिहासातील गाणेही म्हणून दाखवतात. या सर्व प्रकारात धायगुडेसह सर्व विद्यार्थी सामील होतात. या सर्व गोंधळामुळे हेडमास्तर वर्गात येतात. हेडमास्तरांच्या गळ्यात हात टाकत असतानाच मास्तरांचा लगदा खाली पडतो. तोंडातून फेस आलेला असतो. ते पाहताच धायगुडे नम्रपणे (?) विचारतो, "मास्तर मेले काय ?" असे विचारताच हेडमास्तर धायगुडेला कानफडात लगावतात. धायगुडेला या विचित्र प्रसंगाचे आश्चर्य वाटते.

धायगुड्याला शाळेतील या प्रसंगाची खुप गंमत वाटते आणि झालेला प्रकार घरी आईला कसा रंगवून सांगता येईल याचा विचार करत तो घरी येतो. घरी लोकांची बरीच गर्दी दिसते. कारण धायगुड्याच्या बाने चोरून गांजा विकलेला असतो आणि तो गांजा गायीच्या गोठ्यातील पेंडीत सापडतो. हे समजल्यावर निवेदक धायगुडे म्हणतो;-"ते ऐकुन मला कांही विशेष वाटले नाही आमचा बा खंबीर होता. त्याची काळजी नव्हती.-पण भिती एवढीच वाटली की मास्तरांच्या खिशातून पडलेले तुकडे हेडमास्तरांना आवडले तर काय घ्या ?"[१४]

अशाप्रकारे एका धायगुडे नावाच्या इरसाल व अवखळ मुलाचे दर्शन मिरासदार या कथेत घडवितात.

आ) "<u>व्यंकू</u>" :

ग्रामीण जीवनातल्या विसंगतीवर मिरासदार "व्यंकूची शिकवणी" ही कथा उभी करतात. यदू वडार हा आपल्या व्यंकूला शिकविण्यासाठी मास्तरांना विनंती करतो. मास्तर ही जबाबदारी स्वीकारतो. पण बाळबोध

वळणाचा आणि निरागस वृत्तीचा मास्तर जेव्हा व्यंकूसारख्या इरसालाच्या कचाट्यात सापडतो तेव्हा व्यंकूच मास्तरांना बरेच काही शिकवतो. उपहास आणि उपरोधाने व्यंकूची शिकवणी पुरेपूर भरली आहे.

मास्तरांना वाटते की व्यंकू हा किडकिडीत बारा-चौदा वर्षांचा लहान-सा मुलगा असेल पण व्यंकूला पाहताच मास्तर मनातून हबकतो. कारण व्यंकू चांगला अठरा-एकोणीस वर्षांचा, काळाकुट्ट , आडव्या अंगाचा, नकट्या नाकाचा आणि जाड कातडीचा, मिशा भरपूर असणारा बापई गडी होता. मास्तर व्यंकूची शिकवणी सुरू करतात. एक दिवस शिकवणी सुरु असताना मास्तर व्यंकूला प्रश्न विचारतात तेव्हा "जमलेले" पान त्याला थुंकावं लागते. "खाऊ नये तंबाखू, लेका वाईट असतं" असा मास्तरांनी उपदेश केल्यावर "काय वाईट हूतं मास्तर !" या व्यंकूच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मास्तरला देता येत नाही. कारण त्यानं तंबाखूच काय पण पानही खाल्लेलं नसते.

व्यंकू आपल्या मास्तरांचा "वीक पाइंट" ओळखतो आणि "तंबाखू" या वनस्पतीबद्दल देवादिकांचे मत आणि पुरावे सादर करतो. सहाजिकच बाळबोध वळणाचा मास्तर व्यंकूच्या या अगाध (?) ज्ञानाने पाझरतो व बळी पडतो. मास्तर पान-तंबाखू खाताखाता तमाशा पाहण्यापर्यंत प्रगती करतो. आणि ठरवितो की कुठलीही गोष्ट आपण पाहिल्याशिवाय त्याच्याबाबत वाईट मत करू नये. व्यंकूकडून मास्तर बरेच काही शिकतो आणि उत्तरोत्तर "ज्ञानी" पुरुष बनतो.

व्यंकूने ठेवलेली बाई त्याला शोधण्यासाठी मास्तरांच्या खोलीवर येते तेव्हा आपल्या विद्यार्थ्याने बाई (रखेली) ठेवावी आणि आपल्याला त्याची दखलही असू नये याची मास्तरांना खंत वाटते. मग मास्तर हळूहळू व्यंकूकडून या गोष्टी जमवायचे "तोडगे" शिकतो. म्हणूनच "भले मास्तर ! अशी इरेसरी

पायजे. यापैकी या मार्क तुमाला" अशी व्यंकूकडून शाबासकीही मिळवितो. व्यंकू म्हणातो;-"मास्तर, हे अवघड शास्त्र हाय. पण तुमी कच खायाचं काम न्हायी. तुमी टैट रहा. तुमालाबी जमंल. केलं म्हंजे होतं."[१५] असा व्यंकू-कडून गुरुपदेश मिळतो. व्यंकूकडून मास्तर शीळही घालायला शिकतो आणि एकदम "सुधारून" जातो.

ब-याच दिवसानंतर व्यंकू मास्तरांच्या खोलीवर येतो तो निराश झालेला असतो. मास्तर चौकशी करतात तर व्यंकू मास्तरांना ठेवलेल्या बाईची हकिगत सांगतो. तिने व्यंकूला घराबाहेर काढलेले असते. मग व्यंकू निरागसपणे विचा-रतो, "पण मास्तर, तिन आस कशापायी केलं आसंल ?" तेव्हा अभिमानाने छाती फुगवून ताठ मानेने मास्तर म्हणाला, "ती हल्ली माझ्याकडे असते.!"

"व्यंकूची शिकवणी" या कथेतून मिरासदारांनी "ग्रामीण भागत कोण कोणाला कसे शिकवतो" याचे वास्तवपूर्ण चित्रण केले आहे. यदू वडाराचा व्यंकू शिकण्यासाठी मास्तरांच्याकडे शिकवणी सुरु करतो आणि मास्तरांना बरेच कांही शिकवितो. येथे इरसाल विद्यार्थी व्यंकू आणि बालबोध वळणाचा मास्तर यांची ठळक व्यक्तिचित्रे डोळ्यासमोर येतात.

इ) <u>भिकू मुंगळे</u> :

"वर्गातील एक पाठ" या कथेमध्ये मिरासदारांनी ट्रेनिंग कॉलेजमधील एका भिकू मुंगळे नामक विद्यार्थी-शिक्षकाच्या उडालेल्या गोंधळाचा प्रसंग चित्रित केला आहे. या कथेतील भिकू मुंगळ्याचे व्यक्तिचित्र चटकन डोळ्यात भरते. बरीच उमेद बाळगून आणि शिक्षकी पेशाचे फायदे लक्षात घेऊन भिकू मुंगळे याने एस्.टी.सी. च्या वर्गात नांव दाखल केले.

भिकू मुंगळे हा मास्तर होण्याचे का ठरवितो याचे मिरासदार वर्णन करतात पहा -

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

मॅट्रिक झाल्यानंतर भिकू मुंगळे याने एस्.टी.सी.च्या वर्गात नांव घातले तेव्हा त्याच्या अंगात बराच हुरूप होता. कारकून होण्यापेक्षा मास्तर होणे बरें असें त्याचें निरीक्षणाने बनलेले ठाम मत होते. सरकारी नोकरीत कटकटी फार. दिवसभर राबराबायचे. कधी सुट्टीनाही की काम बंद नाही. रजा चुकून मिळायची नाही. वरिष्ठांचा धाक सदैव. त्यापेक्षा मास्तरकी कशी उत्तम, वर्षातून चार-दोन महिने सुट्टया, पुन्हा मेले गेले कुणी तर एखादी जादाच, पण कमी नाही. ऐटीत पेपर तपासायचे, पाचपन्नास पोरांवर अधिकार गाजवायचा, त्यांनी "सर-सर" म्हणायचे. "मुंगळे" या नुसत्या आडनांवांत फारसा जोर नाही. "मुंगळे सर" म्हटले म्हणजे कसे भारदस्त वाटते. त्या सह्ली, त्या शिकवण्या..."[१६]

इतका सगळा बारकाईने विचार करून भिकू मुंगळे मास्तर होण्याच्या ध्येयाने एस्.टी.सी.च्या वर्गात नांव दाखल करतो. सराव पाठ घेण्यासाठी भूगोल विषयातील "चहाचे उत्पन्न-आसाम प्रांत" हा घटक निवडतो. पूर्ण तयारीनिशी वर्गात जातो. पण सराव-पाठाला सरावलेले विद्यार्थी भिकू मुंगळे वर्गात शिरताच गलबला करतात. मुलांना शांत बसवून आकर्षक प्रस्तावना करण्यासाठी, मुलांचे लक्ष पाठाकडे वेधून घेण्यासाठी खणखणीत सुरात विचारले,—"हं सांगा पाहू, सकाळी उठल्यावर तुम्ही काय करता ? .... हात वर करा." या भिकू मुंगळयाच्या प्रश्नाने सगळी मुलें एकमेकांकडे पाहू लागली. गोंधळ नको म्हणून एका मुलाला प्रेमळ आवाजात भिकूने विचारले. त्याने "आपण सकाळी उठल्याबरोबर परसाकडे जातो" हे उत्तर दिले. वर्गात गोंधळ सुरु झाला. परत एकाने "दुध पितो" असे उत्तर दिले. तर तिस-या मुलाला आई नसल्यामुळे त्याने हा प्रश्न ऐकताच भोकांड पसरले. भिकू मुंगळयाचा नाईलाज झाला आणि मग मुलांकडे फारसे लक्ष न देता आपल्या घटकाची सुरवात केली. पण मुलांनी मध्येच माकडाचे प्रकरण घुसडल्याने आपण काय शिकवित आहोत याचे भानच भिकू मुंगळयाला राहिले नाही. एखादी एक्सप्रेस गाडी सुटावी त्याप्रमाणे

त्याने आपल्या बोलण्याचा वेग वाढविला आणि शेवटी घंटा झाल्यावर जिवावरच्या संकटातून सुटल्याप्रमाणे भिकू मुंगळे परीक्षकाची वाट न पाहता शाळेतून निघून गेला.

दुस-या दिवशी भिकू मुंगळे आपले सराव पाठाचे टाचण पाहतो आणि आपला पाठ कसा झाला असावा याची कल्पना येते. सुरवातीचा उत्साह, उमेद पार ढासळून जाते.

भिकू मुंगळे म्हणजे अध्यापक महाविद्यालयात शिकत असणा-या विद्यार्थ्यांचा उत्तम नमुना आहे. मिरासदारांनी अत्यंत वास्तवतेने भिकू मुंगळे आपल्या समोर उभा केला आहे.

ई) ड्रॉईंग मास्तर :

मिरासदारांनी "ड्रॉईंग मास्तरांचा तास" या कथेतून अहंमन्य प्रवृत्तीच्या व मुलांना, विद्यार्थ्यांना काय कळत अशी भावना असणा-या शिक्षकांच्या वर्मावर नेमके बोट ठेवले आहे. निरागस, निष्पाप मुलांच्या अवखळपणातूनही विनोदी प्रसंगनिर्मिती साधली आहे. इतिहासाचे मास्तर रजेवर असल्यामुळे ड्रॉईंग मास्तर निवेदकाच्या वर्गावर जातात. तेथील सर्व प्रसंगामुळे ड्राईंग मास्तरांची प्रतिमा वाचकांच्या चांगलीच लक्षात राहते.

इतिहासाचे मास्तर रजेवर असल्यामुळे व घंटा होऊन पाच मिनिटे होऊन सुध्दा वर्गावर कोणीच न आल्यामुळे सगळ्या वर्गभर दंगा, गोंधळ सुरू होतो. इतक्यात ड्रॉईंग मास्तर वर्गात येतात. आणि ते सांगून टाकतात,"की डोंगरे गुरूजी रजेवर आहेत म्हणून मी आलोय." "पण सर-तुम्ही कसे घेणार इतिहास?" हा निवेदकाचा प्रश्न ऐकुन मास्तर म्हणतात;-"का ? मला नाही घेता येणार इतिहास ?" यावर निवेदक म्हणतो;-"आमच्या ड्रॉईंग मास्तरांचे हे मोठे गंमतीदार बरे का ? आम्ही काही सांगितले की मुद्दाम उलटे म्हणतात.

ड्राईंगच्या तासाला नेहमी असेच. डिझाईन च्या म्हटले की "मॉडेल" काढायचे म्हणून जोरात सांगतात. चक्करच आहेत. कधी काय डोक्यात येईल नेम नाही. म्हणूनच सगळे मास्तर त्यांना तिरशिंगराव का कायसेचे म्हणतात. पण हे खरेच इतिहास घेणार का ? त्यांना इतिहास येतो की नाही कुणास ठाऊक ! येतहि असेल, सरच आहेत त्याअर्थी येत असणारच." [१७]

तेवढयात कुणीतरी उठून म्हणाले, "तुम्हाला येतो सर च्यायला इतिहास ?" मग मात्र मास्तर खवळल्यासारखे दिसले. नाक फेंदारून ते ओरडले - "येतो का म्हणजे काय ? आम्ही कधी इतिहास बिरे शिकलो नाही का काय पूर्वी ? खाड् खाड् पाठ म्हणून दाखवीत असूं. आहांत कुठं ?..." "इतिहास तुमच्यापेक्षा आम्हाला अवघड होता बेटयांनो, तरी मुखोद्गत सगळं. आणि मग ड्राईंग मास्तर सगळा इतिहास बरोबर (?) सांगतात. पानिपतच्या पहिल्या दोन लढाया कोणाकोणात व कशा झाल्या याचे रसभरित वर्णन करतात. पानिपतची तिसरी लढाई कोणाकोणात व कशी झाली हे नीट न सांगता आल्याने ड्राईंग मास्तर गोंधळले. मात्र तसे न भासवता म्हणाले - "नाही ना कुणाला नीट सांगता येत ? हात लेको तुमची .! लहानपणी असली माहिती आमची अगदी तोंडपाठ असायची. आता असं करा पुस्तक उघडा अन् एकदा वाचा बरं धडा. बघू या. काय दिवे लावता ते. धडा पुन्हा वाचून तरी काय कळतं बघू या मला."

मुलांना ते पानिपतची लढाई हा पाठ वाचायला सांगतात. पण त्यामधील कुंजपूरा, विश्वासरावांचे वर्णन, निवेदकाचे वाचन, बारभाई कारस्थान लढाईचा नकाशा यातून मास्तरांनाही आणि मुलांनाही काहीच समजत नाही. तासाची घंटा झाल्यावर "मग उद्या काय घेणार सर ?" या प्रश्नाला दरवाजाकडे जाता जाता ड्रॉईंग मास्तर उत्तर देतात - "तुमच्यापुढे काय टाळकं फोडायचं ? कांही म्हणजे कांहीच तयारी नाही लोको तुमची. छद् .! ती भानगडच नको.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

आपली चित्रकलाचं घेऊ, तेच बरं ।" असे म्हणून सरांनी शिक्षकांची खोली गाठली.

ड्राईंग मास्तर म्हणजे अध्यापकांचा एक इरसाल नमुना आहे. आपण सर्व विषयात तज्ज्ञ आहोत या अहंमन्यतेपोटी ड्रॉईंग मास्तर विद्यार्थ्यांना फस-वत राहतात. पण शेवटी त्यांचेच पितळ उघडे पडते. मिरासदारांच्या शिक्षकाच्या व्यावसायिक अनुभवातून हा ड्रॉईंग मास्तर आपल्यासमोर आलेला आहे. म्हणूनच त्यात वास्तवता व कलात्मकता दिसून येते. आपण सर्व विष-यात "तज्ज्ञ" आहोत असे भासवणारे आणि अगाध ज्ञान पाजळणारे ड्राईंग मास्तर व शाळेतील निरागस विद्यार्थी चांगलेच स्मरणात राहतात.

उ) <u>बापूदेव :</u>

मिरासदारांचा "रानमाणूस" कथेतील बापूदेव चांगलाच स्मरणात राहतो. बापूदेव म्हणजे निवेदकाचा मित्र कुशाचा बाप. घरी गडगंज पैसा असुनसुध्दा तो आपल्या एकुलत्या एका मुलाच्या आजारपणात खर्च करू शकत नाही. पैसा प्यार असणाऱ्या अमानुष वृत्तीच्या व्यक्तिचे चित्रण मिरास-दार येथे करतात. निवेदक म्हणतो – "नुसते जगणं हीच त्याची सर्वात मोठी महत्वाकांक्षा ।"

बापूदेवाला निवेदक चांगलाच ओळखत होता. पुण्याहून सुट्टीला आ-लेला निवेदक कुशाची चौकशी करतो. तर बापूदेव सांगतो कुशा क्षयानं आजारी आहे. "मग काही औषधपाणी ?" या निवेदकाच्या प्रश्नाला बापू-देवचे उत्तर म्हणजे पशूचे की माणसाचे असा प्रश्न पडतो.

कुशा क्षयानं झिजून झिजून मरण पावतो. पण आपल्या एकुलत्या एका मुलाच्या मृत्यूचा बापूदेववर कोणताच परिणाम होत नाही. उलट

"कुशा ! .... कुशा ! गेलास ? .... ब.ऽऽ.रं." एवढंच बोलला आणि पानाची चंची सोडून सुपारीचे खांड चघळत बसला. मृत्यूसारखी भयाण घटना घडली होती पण रडण्याचा अनिवार लोंढा नव्हता की साधा दु:खाचा विव्हल सुस्कारादेखील नव्हता.

कुशा गेल्यानंतर दोन-तीन दिवसांनी निवेदकाला घेऊन बापूदेव अंत्यविधीच्या वस्तू देणाऱ्या दुकानदाराकडे जातो. निवेदकाला याची काहीच कल्पना नसते. बापूदेव त्या विक्रेत्याकडे अंत्यविधीच्या वस्तूंचे बील मागतो. दुकानदार रागाने सांगतो की, असल्या सामानाचे आम्ही बील घेत नाही. दोघांच्यात वादावादी नको म्हणून निवेदक मध्यस्ती करतो व बील देण्यास सांगतो. ते बील वाचून बापूदेव उद्‌गारतो,

"अरे, काय माझं दिवाळं काढायचं ठरवलं होतं का काय तुम्ही ?.. पंचेचाळीस रुपये झाले कसे ? परवा रात्री मसणात दोन बत्या आणल्यात तुम्ही ! दोन बत्या न्यायला काय मला जाळायचं होतं काय ?"[१८] इतका तो पाषाणहृदयी आहे. बापूदेवाच्या चित्रणाद्वारे नराधमाचे रूप कसे असू शकते याचा प्रत्यय येतो. बापूदेवाला दिलेले "रानमाणूस" हे शीर्षक अगदी चपखल असते.

ऊ) इनामदारांचा जावई :

"हरवल्याचा शोध" या कथेतील निवेदक हा इनामदारांचा जावई. रोहिण्या-मृगाच्या पाऊस पडून गेल्यानंतर निवेदक सासऱ्याचं घोडं घेऊन रपेट मारायला शिकत होता. निवेदक घोडयावर बसायला नुकताच शिकलेला होता आणि दुपारच्या भर उन्हात घोडयावरून हिंडायची त्याला लहर येते.

तासभर घोडयाची रपेट करून माघारी फिरण्याचे निवेदक ठरवितो

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पण ओढा जवळ आल्याने आणि तहान फार लागल्याने तो घोड्यावरून खाली उतरतो. इनामदारांचा जावई पाणी पित असता - इतक्यात ओढ्यातील लहान मुले घोडयाचा लगाम खेचतात. त्यामुळे घोडं बिथरते आणि रानात पळून जाते. निवेदक रानातला चिखल तुडवत घोड्याचा शोध घेत राहतो.

मासे पकडत असणा-या तिघा-चौघा लोकांकडे आपल्या घोड्याची चौकशी करतो. ते सरळ उत्तर तर देतच नाहीत उलट नायकांकडून पान खातात आणि त्याला वाटेला लावतात. पुढे भेटलेली म्हातारीही ईनामदारांचा जावई वकील हे समजल्यावर आपल्या शेताला गाडीवाट मिळेल का म्हणून चौकशी करते. नायक आपले वकीली ज्ञान पाजळतो आणि म्हातारीच्या शिव्या-शाप खात निघून जातो. पुढे एक म्हातारा भेटतो तोही घोड्याविषयी नायकाला माहिती देत नाही.

घोड्याच्या शोधात दमून-भागून निराश झालेला नायक रस्त्यावर बसतो. आभाळ भरून आलेलं, अंधार होऊ लागलेला आणि रस्त्यावर आजूबाजूला कोणी नाही अशा वेळी त्याला एक साळुंखीच्या आवाजाची देखणी बाई भेटते. तिच्याजवळ नायक घोड्याची चौकशी करतो आणि तिचं नावावही विचारतो. ती आपलं नाव "राधी" असं सांगते व इतरही माहिती पुरविते. त्या माहिती आधारे नायकाला वाटते की, माझे घोडे हिच्याच रानात चुकले असावे. अशा या वातावरणात, एकान्तात त्या तरुण स्त्रीबरोबर घोड्याचा शोध घेण्यासाठी चालताना नायकाला वेगळाच आनंद वाटत होता. एका वेगळया आनंदात दोघांचं मन ऊतु जात होतं. नायक म्हणतो,-"आम्ही दोघेही सभ्य आणि सात्विक माणसे अशा रीतीने पुढे चाललो. तेवढ्यात समोरून कुणी तरी येत असल्याची चाहूल लागली. तेंव्हा तिने आपला हात सोडवून घेतला.,, कोणी तरी तीन चार माणसे समोरून येत आहेत हे जाणवले. त्यांच्या

मधे काही तरी असल्यासारखे दिसत होते. थोडेसे जवळ आल्यावर मी डोळे ताणून कोण आहे ते बघितले.

— आणि आम्हा दोघांची निष्पाप जिवांचे चेहरे, भ्ररकन् उतरले. कारण समोरनं आली ती मला पहिल्यांदा भेटलेली चौघे माणसे.

— आणि मधी होते माझे घोडे।.." [११]

पावसाळ्यातल्या अंधाऱ्या वेळी नायक घोडयाचा शोध बाजूलाच ठेवून सुंदर तरुण स्त्रीबरोबरच्या सहवासात हरवून जातो. पण यावेळी घोडयाचा शोध लागल्यानंतर मात्र त्याची फजिती होते. घोड्याचे हरवणेही भलत्यावेळी आणि सापडणेही त्याहून भलत्यावेळी. ही कथा प्रसंगनिष्ठ असली तरी तरण्याताठ्या बाईशी लगट करण्याची संधी मिळताच जरा सरकणारा इनामदारांचा जावई वाचकांच्या चांगलाच स्मरणात राहतो.

मिरासदारांच्या कथांतील वरीलप्रमुख व्यक्तिरेखाशिवाय त्यांच्या इतर-ही गौण व्यक्तिरेखा वाचकांच्या मनावर वेगळाच ठसा उमटवतात. देवळाच्या कळसाची कौणी यावी लागते म्हणून उठून जाणारे नामा चौगुले, सदा वाणी, गणपत वाघमोडे, रामा खरात ही चौकडी, काकांचे प्रेत ताब्यात घेण्यासाठी रात्रभर गोंधळ घालणारे विशापंत, डोंगरे, रामभाऊ, हॉस्पिटलमधील शिपाई भटजीबुवा ही मंडळी, सराव पाठाला सरावलेले इरसाल तेवढेच नम्र विद्यार्थी, पुण्या-तील जलप्रलय झालेल्या लोकांना मदत (?) करणारी समस्त - गणा मास्तर, शिवा जमदाडे, बाबू पैलवान, नारायण चेंगट - भोकरवाडीकर मंडळी, चुकामूक घडवून आणणारे काका सोनार, सुताराची आनशी, बापू तांबटाची बायको, कुशाचा मित्र निवेदक, व्यंकूने ठेवलेली बाई इंद्रा, आपण सर्व विषयात "तज्ज्ञ" आहोत असे भासवणारे आणि "अगाध" ज्ञान पाजळणारे झोंडी मास्तर व शाळेतील निरागस विद्यार्थी, धोंडगुडयाची पेंड खाऊन झुलणारे मास्तर, व धोंडगुडयाला कानफटात लगावणारे हेडमास्तर, मोहिनीला पुष्पवाटिकेतून पळवून

आणू म्हणणारे महाराज आणि केवळ बुद्धिचातुर्यावर फिदा होणारी मोहिनी, निवेदकाच्या घरी चोरी झाल्यावर चौकशीसाठी येणारे पोलीस, फौजदार, शेजापाजारी व पाहुणेमंडळी, नागू गवळ्याची बायको आणि ट्रंके-च्या किल्लीसाठी रात्रभर नागूला घुसळणारा व पहाटे चोरी न करताच निघून गेलेला चोर, इनामदारांच्या जावयाला, आपल्या शेतात यायला गाडीवाट मिळेल का ? असा प्रश्न विचारणारी आजीबाई आणि नंतर भेटलेली राधी, दत्तू चष्मेवाल्याला, आपल्या परीने संसाराला मदत करणारी त्याची बायको गंगी, नामांकित श्रीयुत उघडे वकील, गणपत पाटलांबरोबर सुरवातीला ईर्ष्या करणारी परंतु नंतर शरण येणारी विधवा सखूबाई, अशा अनेक व्यक्तींनी आणि वल्लींनी मिरासदारांचे कथाविश्व तुडुंब भरलेले आहे. ही सर्वच गौण पात्रे कथाआशयाला आणि कथेतील मध्यवर्ती पात्राला उठावदारपणा आणतात शिवाय त्यांच्या विशिष्ट अशा वागण्या-बोलण्याने, लकबीने, सवयीने वाचकांच्या चांगलीच लक्षात राहतात.

सारांश :

मिरासदारांच्या कथालेखनातील व्यक्तिरेखांचा अभ्यास केल्यानंतर असे जाणवते की त्यांची प्रत्येक व्यक्तिरेखा त्याच्या खास अशा, वेगळ्या अशा वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे आणि म्हणूनच प्रत्येक व्यक्ति वाचकाच्या मनाचा ताबा घेते, वाचकाच्या लक्षात राहते. विविध स्वभावाच्या आणि प्रवृत्ती-च्या या व्यक्तिरेखा मिरासदारांचे माणूस ओळखण्याचे कौशल्यच प्रकट करतात. व्यक्तींच्या हालचालींचे, बोलण्याचे, लकबीचे, सवयींची वैशिष्ट्ये बारकाव्यासहित मिरासदार रेखाटतात.

मिरासदारांच्या या व्यक्तिचित्रणातील काही व्यक्ती इरसाल आहेत. (त्र्यंबू, धापगुडे), काही भांडखोर (अण्णा देशपांडे, बाबू पैलवान),

आणि धूमी आहेत (राघू देशपांडे), काही बेरकी आहेत (तुका बनकर, गणपत वाघमोडे), काही जगण्यासाठी गुन्हेगारीच्या मार्गांनी गेली आहेत (सोन्या बामण, दत्तू चष्मेवाला), पोराच्या वात्सल्याचे धडगे बांधून त्यावर विडी फुंकत असणारी काही निर्दय आहेत (बापूदेव), यातली काही तशी सरळ पण विक्षिप्त थापाडी आणि बढाईखोर आहेत (नाना घोडके), काही परिस्थितीच्या कचाटयात सापडून दु:खाचे कष्ट, सोसत आहेत (सोमशर्मा, प्रो.सदाशिवराव),काही विलक्षण झोपाळू आहेत (नागू गवळी), योग्य संधी मिळताच पुढे सरकणारीही आहेत (इनामदारांचा जावई) काही अंगी फाजिल आत्मविश्वास बाळगणारी, अहंमन्य प्रवृत्तीची आहेत (भिकू मुंगळे, इर्ड्डी मास्तर, बेबीचे वडिल, वृत्तपत्रकार निवेदक), काही उदार, समंजस, मनमिळावू तेवढीच इर्ष्येबाज आणि अहंकार जोपासणारी आहेत (गणपत पाटील). अशाप्रकारे अनेक स्वभावाचे उत्तम नमुने या कथांतून आपल्यासमोर येतात.

कथागत पात्रे यशस्वी होण्यासाठी मिरासदार पात्रांच्या रंगरूपासह, त्यांची वेशभूषा, त्यांची खास अशी भाषा, त्यांच्या आवडी-निवडी, विशिष्ट सवयी, लकबी या सर्व गोष्टींचे बारकाव्याने निरिक्षण करून चित्रण करतात. शिवाय मिरासदारांच्या कथेत पात्रांची संख्या मर्यादित असते. मिरासदारांच्या व्यक्तिचे शारीरिक वर्णन कौशल्य पहावयाचे असेल तर त्यांच्या अण्णा देशपांडे आणि नागू गवळी या व्यक्तिरेखा डोळयासमोर आणाव्यात. तर पात्रांची वेशभूषा आणि लकबीचे सुक्ष्म निरिक्षण नाना घोडकेच्या व्यक्तिचित्रणात दिसते. व्यक्तिच्या ज्या प्रमुख प्रवृत्ती बनलेल्या आहेत त्यांचीही कारणमीमांसा मिरासदार आपल्या कथेत देतात. सोन्या बामण, दत्तु चष्मेवाला, प्रो.सदाशिवराव, सोमशर्मा, नाना घोडके इत्यादी व्यक्तिचित्रणात त्याची प्रचीती येते.

मिरासदार आपल्या कथेत मध्यवर्ती म्हणून स्वीकारलेल्या व्यक्तिभोवती अन्य गौण वा कमीअधिक महत्त्वाच्या व्यक्ती आणून मध्यवर्ती पात्रांच्या भोवती

त्यांची गुंफण अशी करतात की, मध्यवर्ती पात्र प्रकाशित होतेच पण त्या-बरोबरच या गौण पात्रांच्याही स्वभाव छटा स्पष्ट होतात आणि त्यांच्या स्वभावदर्शनातून विनोद निर्मितीस खुराक मिळत जातो. याचे चांगले उदाहरण म्हणून "कळस" कथेतील तुका बनकर आणि नामा चौगुले, सदा वाणी, गणपत वाघमोडे, रामा खरात ही चौकडी. "झोप" कथेतील नागू गवळी आणि त्याची बायको व चोर. "माझी पहिली "चोरी" या कथेतील निवेदक, पोलीस, फौज-दार, घरची मंडळी, शेजापाजारी व पाहुणे मंडळी यामुळे मुख्य पात्र तर उठा-वदार बनतेच शिवाय इतर पात्रेही वाचकाच्या चांगली लक्षात राहतात हे कौशल्य मिरासदारांना चांगल्या प्रकारे अवगत आहे.

मिरासदारांच्या कथेतील पात्रांना त्यांचे त्यांचे दु:ख आहे, व्यथा आहे की जी झाकण्यासाठी, सोसण्यासाठी ती माणसे बाह्याविष्कार वेगळा दाखवत असली तरी अंत:करणात भावविव्हल असतात. त्यामुळे ती पात्रे हास्योत्पादक वाटली तरी हास्यास्पद ठरत नाहीत. त्यांच्या मनातील दु:खामुळे ती वाच-कांच्या सहानुभूतीला पात्र ठरतात. "नव्याणवबादची सफर" या कथेतील "नाना घोडके", "कोणे एकेकाळी" कथेतील सोमशर्मा, "मुलें पळविण्याचा प्रकार" कथे-तील "वस्तू चष्मेवाला,", "एक सदाशिवराव आणि त्यांची बायको" या कथे-तील प्रो. सदाशिवराव ही पात्रे याचे उत्तम उदाहरणे होत.

मिरासदारांच्या सर्वच व्यक्तिंचे वैशिष्टय म्हणजे या सगळया व्यक्तिंना आयुष्यात रस आहे; जगण्याची जबरदस्त ओढ आहे. नाना घोडकेसारखा माणूस आपल्या जीवनातील अपूर्णता कल्पक थापांनी झाकून टाकून जगण्याचा प्रयत्न करतो तर सोमशर्मासारखा विदूषक आपले दु:ख पचवून हसत हसत जगतो.

आपल्या कथेतील पात्रांशी मिरासदार नेहमी निरागसपणे एकरूप होतात. त्यांच्या मनांत शिरतात, त्यांचे गुणदोष टिपतात. ही एकरूपता कधी अशा पातळीवरची असते की ते प्रथमपुरुषी निवेदन करतात. अशा गोष्टींचा नायक "मी"

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

असतो. (माझ्या बापाची पेंड, माझी पहिली चोरी, सोन्या बामण, रानमाणूस, माझा कै. वृत्तपत्रव्यवसाय या कथा) कधी क्वचित ते मानवी मनाच्या गहिरेपणात खोल बुडी मारतात. (कोणे एके काळी)

ग्रामीण जीवनातल्या धूर्त, बेरकी, कावेबाज व्यक्तिरेखा जितक्या तन्मयतेने आणि ढंगदारपणे मिरासदार रेखाटतात तितक्याच तन्मयतेने ते उदार, मनमोकळ्या, समंजस व्यक्तिरेखाही रेखाटतात. माणसाबद्दलचे, विशेषत: ग्रामीण माणसाबद्दलचे प्रेम, आपूलकी, जिव्हाळा, आस्था ही वैशिष्टये मिरासदारांची व्यक्तिरेखाटने यशस्वी होण्यामागील मुख्य कारण आहे असे म्हणावे लागते. कसबी चित्रकाराने ब्रशाच्या एका फटका-यात चित्राची प्रतिकृती तयार करावी तसे मिरासदारांची व्यक्तिचित्रे कमी शब्दात वाचकांसमोर वास्तव व जिवंतपणे उभी राहतात.

मर्यादा :
-----

मिरासदारांच्या एकूणच व्यक्तिरेखाटनातून मानवी मनातील संमिश्र गुंतागुंत, मानवी मनाचे विविध पापुद्रे क्वचितच उलगडले जातात. मानवी मनाच्या तळाचा, अंत:रंगाचा वेध घेतला जात नाही. वरवरचे चित्रण ते करतात. पात्रांचे वागणे, बोलणे, सवयी यासाठी काहीवेळा मिरासदार अतिशयोक्तीचा आधार घेतात. व्यक्तिच्या मनातील मानसिक संघर्ष मिरासदारांच्या व्यक्तिचित्रणातून दिसून येत नाही. व्यक्तिच्या बाहय स्वरूपाचे ढोबळ चित्रण मिरासदार करतात.

या सर्व मर्यादा लक्षात घेतल्या तरी मिरासदारांची पात्रे दर्शनात्मक पध्दतीने वाचकांसमोर येत असल्यामुळे पात्रांचे विचार, भाव, मने या सर्वांचे प्रकटीकरण होते. त्यामुळे लेखकाच्या मध्यस्तीविनाच ही पात्रे वाचकापर्यंत पोहोचतात व वाचकांच्या मनाला भिडतात.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

या प्रकरणामध्ये मिरासदारांच्या कथेतील ठळक व्यक्तिचित्रांची वैशिष्टये आपण पाहिली. या पुढील चौथ्या प्रकरणांमध्ये मिरासदारांच्या कथांच्या वाङ्मयीन गुणवैशिष्टयांचा शोध आपणास घ्यावयाचा आहे.

.....

## प्रकरण तिसरे

## सं द र्भ ग्रं थ


१) मिरासदार द.मा. : "मिरासदारी", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९८०, पृ.११.

२) उपरोक्त [१] : पृ. ३५०-५१

३) मिरासदार द.मा. : "माझ्या बापाची पेंड" सुपर्ण प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, पुनर्मुद्रण, १९९०, पृ.५९.

४) मिरासदार द.मा. : "गप्पागोष्टी", कुलकर्णी ग्रंथालय, पुणे, प्रथमावृत्ती, १९६३, पृ.१२३.

५) उपरोक्त [३] : पृ. ५८

६) उपरोक्त [४] : पृ. १०७

७) उपरोक्त [४] : पृ. ९४

८) उपरोक्त [३] : पृ. ८०

९) उपरोक्त [४] : पृ. १२४

१०) उपरोक्त [३] : पृ. २७

११) उपरोक्त [३] : पृ. १२०

१२) उपरोक्त [३] : पृ. २०

१३) उपरोक्त [३] : पृ. २१

१४) उपरोक्त [३] : पृ. १२-१३

१५) उपरोक्त [३] : पृ. १४१

१६) उपरोक्त [४] : पृ. ५५

१७) उपरोक्त [४] : पृ. १८

१८) उपरोक्त [३] : पृ. ११८-१९

१९) उपरोक्त [३] : पृ. १५७


.....